पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ३
सभावृत्तांत

दिनांक : ४/८/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ४/८/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. साबळे जगन्नाथ दगडू - सभापती
२. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार - उपसभापती
३. मा. आदियाल (शीख) शोभा गुरूमितसिंग
४. मा. सुतार विजया विजय
५. मा. सुपे भाऊसाहेब रामभाऊ
६. मा. कुमार आर.एस.
७. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबु नायर

याशिवाय मा.कारचे - सहा.आयुक्त,मा.चाकणकर- उपनगरसचिव,मा.पाटील - कार्यकारी अभियंता , मा. सुर्यवंशी - कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक - १) दापोडी परिसरातील झोपडपट्ट्यांमध्ये एफ.आर.पी.वाचनालय, बाकडे पुरविणे व बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत..

विषय क्रमांक - २) प्रभाग क्र. ६८ मधील मलनि:सारण केंद्र (लिंक रोड) परिसरातील शौचालयावर मजला वाढविणेबाबत ..मा. जगन्नाथ साबळे ,मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ३) प्रभाग क्रमांक ६८ मधिल लिंकरोड झोपडपट्टी व स्मशानभुमी लगतच्या झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामाची दुरूस्ती करणेबाबत..मा. जगन्नाथ साबळे मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ४) मोरवाडी लालटोपीनगर भागामध्ये स्वच्छतागृह / शौचालय बांधणेबाबत ..मा. बाबु नायर मा. अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ५) मोरवाडी गावठाणमध्ये नविन दुमजली १६ सीट्सचे संडास ब्लॉक /शौचालय बांधणेबाबत .. मा. बाबु नायर ,मा. अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ६) तरतूद वर्ग करणेबाबत.. मा. बाबु नायर , मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक - ७) वॉर्ड क्र. ६८ मध्ये शौचालय व वाचनालय व बसस्टॉप बांधणेबाबत.. मा. अख्तरहुसेन चौधरी , मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव

दिनांक २१/०७/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले..

----------

ठराव क्रमांक- ६ विषय क्रमांक- १
दिनांक- ४/८/२०१० विभाग :- झोनिपु स्थापत्य
सूचक- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा. कुमार आर.एस.
संदर्भ- मा.सक्षम प्राधिकारी यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/३५६/२०१० दि.३०/७/२०१०

मा.सक्षम प्राधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दापोडी परिसरातील झोपडपट्ट्यांमध्ये एफ.आर.पी.वाचनालय,बाकडे पुरविणे व बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी र.रू. ९,८०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- ७ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ४/०८/२०१०
सूचक :- मा.जगन्नाथ साबळे अनुमोदक :- मा. बाबु नायर
संदर्भ- मा. जगन्नाथ साबळे , मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र. ६८ मधील लिंकरोड लगतच्या मलनि:सारण केंद्र परिसरात १२ सिट्सचे शौचालय बांधणेत आले असून त्याचा वापर महिलांसाठी होत आहे. सदर झोपडपट्टीमध्ये अपु-या शौचालयामुळे झोपडपट्टीतील नागरिक स्मशानभुमीकडे जाणा-या रस्त्यावर शौचास बसतात. त्यामुळे त्या परिसरात अनारोग्य परिस्थिती निर्माण होत आहे. मलनि:सारण केंद्र परिसरातील शौचालयावर मजला वाढविल्यास तेथील नागरिकांची सोय होणार असल्याने प्रभाग क्र. ६८ मधील मलनि:सारण केंद्र (लिंकरोड) परिसरातील शौचालयावर मजला वाढविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- ८ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ४/०८/२०१०
सूचक :- मा.जगन्नाथ साबळे अनुमोदक :- मा. बाबु नायर
संदर्भ- मा. जगन्नाथ साबळे मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.६८ मधील लिंकरोड झोपडपट्टी व स्मशानभुमी लगतच्या झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामाची दुरूस्ती करणे या कामामधुन लिंकरोड झोपडपट्टी व स्मशानभुमी लगतच्या झोपडपट्टीमधील गटर्स, कॉंक्रीट पेव्हींग, स्वच्छतागृह यांची दुरूस्तीची कामे करण्यात यावीत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- ९ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ४/०८/२०१०
सूचक :- मा.बाबु नायर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ- मा. बाबु नायर मा. अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

मोरवाडी येथील लालटोपीनगर भागामध्ये लोकसंख्येच्या आधारे शौचालयाची कोणतीही व्यवस्था नसल्याने लालटोपीनगर भागामध्ये स्वच्छतागृह / शौचालय बांधणेकामी र.रू. १५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १० विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ४/०८/२०१०
सूचक :- मा.बाबु नायर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ- मा. बाबु नायर मा. अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

मोरवाडी गावठाणमध्ये सध्या असलेल्या शौचालयाची दुरावस्था झालेली असल्याने सध्याचे शौचालय पाडून त्याठिकाणी नविन दुमजली १६ सीट्सचे संडास ब्लॉक / शौचालय बांधणेकामी र.रू. २२,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- ११ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ४/०८/२०१०
सूचक :- मा.बाबु नायर अनुमोदक :- मा.आर.एस.कुमार
संदर्भ- मा. बाबु नायर मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव..

झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण व समाजकल्याण समिती अंतर्गत झोपडपट्टयांमधील कामांसाठी सन २०१०-२०११ साठीच्या बजेटमधील र.रू. २ कोटी रक्कम तालेरा रूग्णालय विस्तारीकरण कामासाठी वर्ग करणेत आली आहे, तथापि झोपडपट्टीमधील कामांसाठी तरतूद कमी पडत असलेने तालेरा रूग्णालय कामासाठी वर्ग केलेली र.रू. २ कोटी पुनश्च झोपडपट्टी विभागाकडे वर्ग करणेचा प्रस्ताव ठेवणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १२ विषय क्रमांक :- ७

दिनांक :- ४/०८/२०१०

सूचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा. बाबु नायर

संदर्भ- मा.अख्तरहुसेन चौधरी मा. बाबु नायर यांचा प्रस्ताव..

वॉर्ड क्र.६८ मध्ये झोपडपट्टीवासियांसाठी आवश्यक प्रमाणात शौचालये, नागरिकांचे सोयीसाठी वाचनालय व बसस्टॉप बांधणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(साबळे जगन्नाथ दगडू)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/०९/कावि/ १०५०/२०१०
दिनांक :- ५/ ८ /२०१०

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.